रून उठलीं, त्या शिपायांनीं आपल्या अमलदारांवर बंदुका झाडल्या, आणि तेथून ते पायपिटी करीत दिल्लीस गेले. तेथें जुन्या मोगल बादशाहांचा वारस म्हणविणारा आणि इंग्लिशांकडून पेनशन (बैठें वेतन) मिळत असे त्यावर गुजारा करून राहणारा, असा एक तद्देशीय वयानें म्हातारा राजा होता. त्याला त्याच्या राजवाड्यांतून बाहेर काढून, त्याला बादशाहा केलें आहे म्हणून डांगोरा पिटवून, तेथील देशी पलटणींना आपल्या अमलदारांना दग्यानें ठार मारून त्या बंडाला मिळण्याकरितां त्यांनीं चिथविलें.

हिंदुस्तानांतील पलटणी शिपायांचा दंगा किंवा बंड, १८५७.

नंतर थोड्या दिवसांत अर्ध्या उत्तर हिंदुस्तानांत बंडाच्या आगीचा डोंब उसळला, आणि थोडे हजार इंग्लिश लोक ह्यांना लाखों पिसाळलेल्या तद्देशीय लोकांविरुद्ध तोंड देऊन तगाव काढावा लागला. त्या वेळीं सुदैवानें प्रतापी राज्यनीतिविशारद (मुतसद्दी) कान्निग ह्याचा पुत्र लार्ड कान्निग हा गव्हर्नर-जनरल होता, आणि वो शूर, शांत, आणि समर्थ, पुरुष होता. हा भयंकर काळ ज्यांना स्मरतो त्यांच्या अंतःकरणांत दोन गोष्टी सदा सर्व गोष्टींहून पुढें उभ्या राहतील. त्यांपैकीं, इंग्लिश पुरुष, बायका, आणि मुलें, ह्यांच्या अधमपणानें केलेल्या कत्तलीचें कधींच विसर पडावयाचा नाहीं असें रोमांच उभे करणारें दारुण भय, ही एक गोष्ट; दुसरी, त्या वेळचे गव्हर्नर्स, सेनापति, आणि तें बंड मोडण्याच्या कामांत ज्यांचा संबंध होता ते सर्व लोक, ह्यांची त्या प्रसंगीं उदार आणि तत्परतेची वागणूक, ही होय. सर जान लॉरेन्स हा त्या समयीं पंजाबचा गव्हर्नर (कमिशनर) होता. त्यानें आपल्या ताब्यांतील देशी पलटणींतल्या शिपायांना एकदम निःशस्त्र केलें; आणि आपल्यावर कदाचित्

संकट येईल ह्या गोष्टीविषयीं बेफिकीर राहून, आपल्या ताब्यांतील सारें **इंग्लिश** सैन्य आपल्या विश्वासू **शीख** लोकांसमवेत **दिल्लीला** वेढा घालण्यासाठीं त्यानें पाठविलें. **सर हेन्री लॉरेन्स** हा त्या समयीं **अयोध्येचा गव्हर्नर** (कमिशनर) होता, त्यानें, आपल्या हाताखालच्या लहानशा फौजेच्यानें बंडवाले फार भारी असल्यामुळें त्यांचें पारिपत्य करवणार नाहीं असें पाहून, **लखनौ** एथील **रेसिडेन्ट** राहण्याच्या वाड्याची मजबुती केली, आणि तेथील सर्व **इंग्लिश** लोकांना त्या वाड्यांत राहवयास नेऊन, बंडवाल्यांनीं वेढा घातला होता त्यापासून त्यानें बचावाचा प्रयत्न केला. पुढें एका महिन्यानें त्याला कुलपी गोळा लागून तो मरण पावला, परंतु त्याचे मरतेवेळेचे शब्द, " कधींही शरण जाऊं नका, " हे होते.

कानपूर एथें **सर ह्यू व्हुईलर** नांवाचा शूर वृद्ध **कमांडर** (सरदार किंवा सेनापति) होता, तो फसला. **नाना साहेब** नांवाचा एक तद्देशीय राजा होता, त्यावर विश्वास ठेवला असतां कांहीं हरकत नाहीं असें त्याला वाटून, त्यानें त्याची कुमक मागितली. परंतु तो **नाना** जेव्हां कुमकेकरितां आला तेव्हां तो बंडवाल्या लोकांचा मुख्य झाला, आणि त्यानें **व्हुईलर**वर उलटा हल्ला केला. तेव्हां **व्हुईलर** ह्यानें, ५०० पुरुष, आणि बायका व मुलें मिळून ५००, इतक्या माणसांसहवर्तमान कांहीं जुन्या बराकी होत्या त्यांचा आश्रय केला. तेथें बंडवाल्या शिपायांच्या भडिमाराखालून पार जाऊन पलीकडे विहिर होती तींवर पावल्यावांचून पाण्याचा एक थेंब देखील मिळण्याची सवड नव्हती. शेवटीं, **नाना साहेबानें गंगा** नदींतून बोटींत बसून तुम्हांला माघारें जाऊं देतों असें, **व्हुईलराला** सांगून पाठविलें, तें

कानपूर एथील कत्तल, तारीख १५ जूलई, १८५७.

त्याचें सांगणें व्हुईलराला पतकरणें भाग पडलें. परंतु त्या साऱ्या माणसांना सुटून जाऊं देण्याचा त्या नानाचा इरादा कधींच नव्हता. तीं माणसें नदींतील बोटींत बसतात तोंच त्यांवर गोळ्यांचा मारा केला, तेव्हां बायका व मुलें मिळून २५० माणसें जिवंत उरलीं, त्यांना त्या शहरांत माघारीं नेलें. तेथें, दुखणाईत झालेलीं आणि भयानें घाबरलेलीं, अशीं तीं माणसें अठरा दिवस राहिलीं, आणि नंतर, जूलईच्या १५ व्या तारिखेस, जेव्हां शूर जनरल हाव्हलॉक हा त्यांना सोडविण्याकरितां अगदीं नजीक येऊन ठेपला तेव्हां, त्या नानानें, त्यांची सुटका होईल ह्या भीतीनें, तीं कोंडून ठेवलीं होतीं तेथें शिपाई पाठविले, त्यांनीं त्या सर्वांची कत्तल करून तुकडे तुकडे केले, आणि त्यांचीं प्रेतें कानपूर एथील विहिरींत टाकलीं.

ही बातमी इंग्लिश लोकांनीं जेव्हां ऐकली तेव्हां ते क्रोधानें अगदीं वेडे झाले, आणि कान्निंग ह्याला, त्यांला क्रूरपणानें सूड घेण्यापासून निवारण्याला महत्संकट पडलें. परंतु तो खंबीर होता; त्यानें जे साक्षीपुराव्यानें अपराधी ठरले त्यांना कडक शासनें केली. परंतु तो इंग्लिशांना निरपराध लोकांचे प्राण घेऊन त्यांच्या रक्ताचा डाग आपल्या प्रतिष्ठेला लावून घेऊं देईना, आणि खरोखरच तद्देशीय लोकांपैकीं पुष्कळ लोक इमानी आणि सच्चे होते, आणि त्यांनीं आपले जीव धोक्यांत घालून इंग्लिश बायका आणि मुलें ह्यांचे प्राण वांचविले. असो, इतक्यांत लवकरच ओहोट वळला. नवीन फौज येऊन दाखल होण्यापूर्वींच दिल्ली सेप्टेंबरांत घेतली. नंतर युद्ध काय तें मुख्यत्वें लखनौ एथें चालू राहिलें. त्या शहराला चार महिने बंडवाल्यांचा गच्च वेढा पडलेला होता.

कान्निंग ह्याचा न्याय.

तेथील लोक उपाशीं मरत होते, आणि दररोज आपली कत्तल खास होते असें त्यांना वाटे, परंतु त्यांनीं तशा संकटांत टिकाव काढला, आणि कुमक इतक्यांत येतच होती. आपल्या हाइलंड पलटणींच्या योगें जयामागून जय मिळवीत येण्याऱ्या हाव्हलॉक नांवाच्या सरदाराच्या सहवर्तमान, सर जेम्स ऊट्रम ह्यानें लखनौ एथील रेसिडेन्सी, म्हणजे रेसिडेन्ट राहण्याचा वाडा, १८५७ त सेप्टेंबरच्या २३ व्या तारिखेस बंडवाल्यांचा वेढा उठवून सोडविला, तेव्हां दाढ्यावाले शिपाई लहान लहान मुलांना हातांनीं उचलून घेऊन वेंगांटतांना मुलांप्रमाणें रडले, आणि त्यांना कानपूर एथील भयंकर प्रसंगासारख्या प्रसंगापासून देवानें वांचविलें म्हणून त्यांनी देवाचे उपकार मानले. सर हेन्री हाव्हलॉक हा पुढें लवकरच मृत्यु पावला, परंतु सर कॉलिन काम्पबेल हा मोटी फौज घेऊन नोव्हेंबरांत येऊन तेथील रखवाली फौजेच्या तुकडीला सुरक्षित स्थलीं नेवून ठेवी, तोंपर्यंत, ऊट्रम ह्यानें त्या रेसिडेन्सीचा बंडवाल्यांपासून बचाव केला. १८५८ च्या एप्रिल महिन्यांत खुद्द ते लखनौ शहर शेवटीं घेतलें.

लखनौ एथील रेसिडेन्सीची वेढ्यापासून सोडवणूक, तारीख २३ सेप्टेंबर, १८५७.

पुढें सर ह्यू रोझ ह्यानें १८५८ सालच्या उष्ण कालामध्ये मध्य हिंदुस्तानामधून मोटी विजयाची मोहीम केली, तीनंतर त्या बंडाचा हळूहळू चुराडा झाला; आणि मध्यावधींत, जो फेरफार फार दिवसांपासून योजिलेला होता, तो त्या शिपायांच्या दंग्यानें त्वरेनें घडवून आणिला. १८५८ च्या जून महिन्यांत ईस्ट इंडिया कंपनी नाहींशी झाली, हिंदुस्तानचें राज्य खुद्द इंग्लंडच्या सरकाराच्या ताब्यांत घेतलें, आणि १८५८ त नोव्हेंबरच्या १ ल्या तारिखेस इंग्लंडची

राणी हिंदुस्तानची राज्ञी झाली म्हणून जाहीरनामे त्या देशांत सर्वत्र वाचले. कंपनीची फौज राणीसरकारच्या फौजेंत सामील केली; आणि लार्ड कानिंग हा त्या समयीं गव्हर्नर-जनरल होता, तो पहिला "व्हाइसरॉय," म्हणजे राणीचा प्रतिनिधि, झाला. ह्यानंतर त्या देशाची लार्ड कानिंग ह्याच्या अमलाखाली, आणि पुढें, सर जान लॉरेन्स ह्याला लार्ड जान लॉरेन्स हा किताब मिळालेला होता त्याच्या अमलाखालीं, फार सुधारणा झाली. नवीन कालवे बांधले, टेलिग्राफ्स, म्हणजे तारायंत्रें, सर्व देशभर निर्माण झालीं, आणि १८६२ च्या पूर्वी एकंदर १३६०त एकही मैल कमी नाही इतके मैल लांबीची लोखंडी सडक बांधली. कापसाची लागवड करण्याविषयीं प्रोत्साहन केलें, आणि शेंकडों खंडी कापूस मांचेस्टर एथील गिरण्यांस पुरविण्यासाठीं त्या देशांतून रवाना होऊं लागला. १८६६, १८७३, आणि १८७७, ह्या सालांत भयंकर दुष्काळ त्या देशांत पडले, तथापि, त्या देशांतील गरीब लोकांना हालांतून सोडविण्याकरितां फार प्रयत्न केले, प्रत्येक इलाख्यांत सार्वजनिक शाळा आणि कालेजिझ, म्हणजे पाठशाळा, स्थापल्या. त्या देशांतील सरकारी नौकरींत तद्देशीय लोकांना हळूहळू घेऊं लागले, आणि लार्ड नार्थब्रूक आणि लार्ड मेयो ह्यांच्या कारकीर्दींत कायदे पूर्वीपेक्षां न्यायाचे, आणि कर हलके, केले. १८७५ त प्रिन्स आफ् वेल्स ह्यांची स्वारी त्या देशांतून राजकीय थाटानें फिरली, आणि १८७७ त राणीनें "एम्प्रेस आफ् इंडिया" (हिंदुस्तानची सम्राज्ञी) हा किताब स्वीकारला. १८७८ त, जेव्हां रशियाशीं यूरोपांत युद्ध

ईस्ट इंडिया कंपनीची समाप्ति, १८५८.

राणीसरकारच्या ताब्यांत आल्यावरची हिंदुस्तानाची स्थिति.

होण्याचें अरिष्ट उत्पन्न झालेलें होतें, तेव्हां हिंदुस्तानांतील देशी फौज पहिल्यानेंच समुद्र ओलांडून माल्टा एथें नेली; आणि १८८२ त देशी फौजेंतील शिपाई इंग्लिश शिपायांच्या कुशीला कूस लावून ईजिप्टमध्यें खरोखर लढले, आणि लंडनांत त्या ईजिप्टांतील जयाच्या संबंधानें झालेल्या मिरवणुकींत ते हाजीर होते. ह्या प्रकारें, ब्रिटनांत ज्या काळीं रानटी लोकांची वस्ती होती त्या काळी प्राचीन विद्यांनीं परिपूर्ण असलेल्या पूर्वेकडील ह्या विस्तीर्ण हिंदुस्तान देशाचा, ब्रिटिश लोकांच्या साम्राज्याचा केन्द्र किंवा मध्य असें जें पश्चिमेकडील लहानसें बेट, त्या बेटाशीं, हळूहळू अधिकाधिक निकट लागाबांधा जुळत आहे. पुढें येणाऱ्या दूरच्या भावि कालांत आमच्या हिंदुस्तानांतील सत्तेची किंवा अमलाची काय स्थिति होईल, हें कोणाच्यानें सांगवणार नाहीं, परंतु आमच्या महान महान राजनीतिविशारद पुरुषांनीं, आणि आमच्या राजपुत्रांनीं, त्या देशांत आमचें निष्कंटक आणि कल्याणकारक राज्य चिरस्थायी करण्यासाठीं आपल्याकडून होईल तितका प्रयत्न केलेला आहे.

व्हिक्टोरिया हिंदुस्तानची सम्राज्ञी, होते.

हिंदुस्तानांतील शिपायांच्या दंग्यानंतर इंग्लंड ज्यांत गुंतलेले होतें अशीं आजपर्यंतचीं मुख्य युद्धें येणेप्रमाणें. (१) १८५५ त चीन देशाशीं झालेलें युद्ध: तेंच १८६० त पुनः उपस्थित झालें, आणि त्या नव्या युद्धांत इंग्लिश आणि फ्रेंच हे पेकिनांत शिरले. (२) आबिस्सिनियाचा राजा थियोडोर ह्याच्यापासून कांहीं इंग्लिश लोकांची सुटका करण्यासाठीं १८६७ सालीं सर राबर्ट नेपियर ह्याच्या हुकमतीखालीं त्या आबिस्सिनिया देशांत केलेली स्वारी; त्या स्वारींत तो थियोडोर राजा आपल्या किल्ल्यां-

तंच ठार मारला गेला. (३) **इंग्लंड**च्या संरक्षणाखालीं असलेल्या लोकजातींवर हल्ला करणाऱ्या, **गोल्ड कोस्ट** (सोनें जेथें मिळे असा आफ्रिकेचा पश्चिम किनारा) वरील **अशान्टीझ** लोकांविरुद्ध, **सर गार्नेट वूल्स्ली** ह्याच्या हुकमतीखालीं केलेली **१८७३** सालांतील विजयाची स्वारी. (४) सदतीस वर्षांपूर्वी जसा **सर अलेक्झांडर बर्न्स** ह्याचा दग्यानें खून केलेला होता, त्याप्रमाणेच बहुत वांत्यांनीं, **सर लूइ काव्हानारी** नांवाच्या **इंग्लिशां**कडील वकीलाचा दग्यानें खून झाला, त्याचा सूड घेण्यासाठीं १८७९–१८८० सालीं जेव्हां **सर फ्रेडरिक राबर्ट्स** ह्यानें आपल्या फौजेनिशीं **अफघाणिस्तानांत** शर्तमर्दीचा कूच केला, तेव्हां झालेलें युद्ध. (५) **झुलूझ** आणि **बोअर्स** ह्या लोकांविरुद्ध १८७९ आणि **१८८१** ह्या दोन सालांत केलेलीं दोन असमाधानकारक युद्धें. (६)१८८४–१८८५ सालांत **सूडान** नांवाच्या मुलुखांत, **अरबां**च्या विरुद्ध **इजिप्ट** देशाचा **खेडीव्ह** (राजविशेष) ह्याचा पुस्तपन्हा करण्याच्या संबंधानें झालेलें युद्ध; त्यांत इतिहासांत पहिल्यानेच **युरोपियन** फौज **नाइल** नदीच्या पात्रांतून बोटींतून वर चाल करून गेली. त्याच युद्धांत **चार्लस गॉर्डन** नांवाच्या वीराचें **खार्टूम** एथें प्राणहरण झालें.

अफघाणिस्तानांत आणि आफ्रिकेंत झालेलीं युद्धें, १८६७–१८८६.

इंग्लिश लोकांच्या स्थितीवर ह्यांपैकीं एकाही युद्धाचा मोठासा कांहीं परिणाम झाला नाहीं, आणि आतां आम्हांला थोड्याच पृष्ठांचा अवकाश राहिलेला आहे, त्यांत, मागल्या पंचवीस वर्षांत **इंग्लंडा**चें काय वाईटबरें झालें तें यत्न करून आपणांला समजून घेतलें पाहिजे.

ह्या पंचवीस वर्षांत, प्रधानमंडल कांहींवेळ **कान्सर्व्हेटिव्ह** पक्षाचें, आणि कांहींवेळ **लिबरल** पक्षाचें, अशी प्रधानमंडळांत अदलाबदल कित्येक वेळां झालेली आहे. पहिल्यानें **कान्सर्व्हेटिव्ह** पक्षाच्या प्रधानमंडलांत पुढाईत **लार्ड डार्बी** व **लिबरल** पक्षाच्या प्रधानमंडलांत **लार्ड पामर्स्टन** हा होता. नंतर **लार्ड पामर्स्टन** १८६५ च्या आक्टोबरांत वारला. तेव्हां **लिबरल** पक्षाच्या प्रधानमंडलांत कांहीं महिने **लार्ड जान रस्सेल** हा मुख्य, प्रधान असून राज्यकारभार चालला. नंतर **डिझरेली** (ह्याला पुढें लार्ड बेकन्स्फील्ड हा किताब १८७६ त दिला) हा **कान्सर्व्हेटिव्ह** पक्ष्याच्या प्रधानमंडलांत, आणि **ग्लाड्स्टन** हा **लिबरल** पक्षाच्या प्रधानमंडलांत पुढाईत झाला. जरी त्या दोहों पक्षांचा पुष्कळ गोष्टींच्या संबंधानें अर्थात् मतभेद झालेला आहे, तरी त्या उभय पक्षांनीं **इंग्लंडां**तील कामकरी लोकवर्गाची स्थिति सुधारण्याविषयीं, आणि सर्व **इंग्लिश** प्रजाजनांला राज्यकारभारांतील सत्तेचा योग्य वांटा देण्याविषयीं आपआपल्याकडून होईल तितका प्रयत्न केलेला आहे. १८५८ सालांत **लार्ड डार्बी** हा मुख्य प्रधान असून, त्याच्या पुढाइतीखालीं **कान्सर्व्हेटिव्ह** पक्षांतील लोकांनीं, **पार्लमेंटां**त **यहुदी** किंवा **इस्राएल** लोकांना घेण्याविषयीं कायद्याचा मसुदा पसार करविला; आणि १८६७ त, एक **रिफॉर्म बिल**, म्हणजे **पार्लमेंटा**ची सुधारणा करण्याविषयींच्या कायद्याचा मसुदा, पसार करविला. त्या कायद्यानें बरोझ, म्हणजे सनदी गांव, ह्यांतील वर्षास ४ पौंड भाडें देणाऱ्या घरबारी (कुटुंबी) लोकांना, आणि वर्षास १० पौंड भाडें देऊन राहणाऱ्या बिऱ्हाडकरूंना, **पार्लमेंट**च्या सभासदांच्या निवडणुकींत मत दे-

रिफार्म बिल्स. १८५८–१८८५.

ण्याचा अधिकार दिला; तथापि खेड्यापाड्यांतील धारेकरी कुळांना दरसाल १२ पौंड सारा किंवा धारा देत असल्यास मात्र तो मत देण्याचा अधिकार दिलेला होता. १८७२ सालीं लिबरल पक्षांतील लोकांनीं ग्लाड्स्टन ह्याच्या प्रमुखतेखालीं "बाल्लट आक्ट" (गुलिकाद्वारा, किंवा लेखद्वारा, गुप्त मत देण्याविषयीं कायदा) नांवाचा कायदा पसार करविला. त्या कायद्यांत ठरलेल्या मत देण्याच्या प्रकारानें कोणी माणूस कोणत्या तर्फे मत देणार हें कोणासही कळावयाजोगें नाहीं. १८८५ त मिस्टर ग्लाड्स्टन ह्यानें "रिप्रिझेन्टेशन आफ् धि पीपल" बिल, म्हणजे लोकांच्या प्रतिनिधित्वाविषयीं कायद्याचा मसुदा, पसार करविला. सर्व कुटुंबी किंवा खटलेवाईक व सडे बिऱ्हाडकरू शहरांत राहोत किंवा खेड्यांत राहोत, त्यांनीं जर एकाच घरांत एक वर्षपर्यंत सतत राहून आपलें भाडें चुकविलें असेल तर त्यांना पार्लमेंटाच्या सभासदांच्या निवडणुकींत मत देण्याचा अधिकार आहे असा त्या कायद्यानें ठराव झाला. ह्या ठरावामुळें, लहान लहान खेड्यांतील देखील कामकऱ्यांना आणि मजूरांना आतां देशाच्या राज्यकारभारांत प्रतिनिधिद्वारा संमति देण्याचा अधिकार आहे, आणि त्या कायद्यानें निवडणुकांत मत देण्याविषयीं अधिकारी लोकांच्या पटांत सुमारें पंचवीस लक्ष नवीन अधिकारी लोक दाखल झाले.

ऑर्सीनी आणि त्याचे कुलपी गोळे, १८५८.

मधल्या काळांत इतर देशांतील धामधुमींनीं किंवा बखेड्यांनीं इंग्लंडांत काळजी उत्पन्न केली. १८५८ त कोणाएका ऑर्सीनी नांवाच्या एका इटालियनानें फ्रेंचांच्या बादशाहाच्या गाडींत कुलपी गोळे फेंकून त्याला दग्यानें ठार मारण्याचा प्रयत्न केला-

आणि त्या दुष्ट मसलतींत सामील असलेल्या लोकांपैकीं कांहीं जणांना **इंग्लंडांत** आश्रय मिळाला म्हणून **फ्रेंच** इतके रागावले, कीं, **इंग्लंड** आणि **फ्रान्स** ह्यांच्या दरम्यान युद्ध होतें कीं काय अशी **इंग्लंडांतील** लोकांना भीति पडली. तीमुळें **राइफल व्हॉलन्टीयर्स**, म्हणजे राइफल नांवाची बंदूक बाळगून आपखुशीनें मुफत नौकरी करण्यास तयार असे शिपाई, होण्याविषयीं **लार्ड पामर्स्टन** ह्यानें लोकांना प्रोत्साहन केलें, त्या योगें अशा **व्हॉलन्टीयर्सांची** संख्या आतां मोठ्या जलदीनें वाढली, आणि त्या सर्व लोकांना सरकारच्या युद्धसंबंधी खात्याच्या ताब्यांत दिलें, त्यामुळें ते **व्हॉलन्टीयर्स ब्रिटिश** फौजेचा एक भाग झाले. परंतु **फ्रान्साशीं** युद्ध उद्भवलें नाहीं, आणि १८६० त उलटा **कॉब्डेन** ह्यानें **इंग्लंड** आणि **फ्रान्स** ह्यांच्या दरम्यान एक मोठा उपयोगी असा व्यापारसंबंधी तह घडवून आणला. १८७० त **फ्रान्स** आणि **प्रुशिया** ह्यांच्या दरम्यान झालेल्या भयंकर युद्धांत देखील **इंग्लंडाला** कांहीं उपसर्ग लागला नाहीं, त्यांत स्वस्थता राहिली होती, आणि **पारिसाला** वेढा पडून तेथें **कॉम्म्यून**, म्हणजे एक प्रकारचें समाईक मालकीचें स्थानिक स्वराज्य, स्थापण्यासाठीं तेथील सरकाराविरुद्ध बंड झालें तेव्हां **तिसऱ्या नपोलियनानें इंग्लंडांत** आश्रय केला, आणि तेथें तो १८७३ त मरण पावला.

व्हॉलन्टीयर्स ह्यांविषयीं बंदोबस्त होतो, १८५८.

फ्रान्स आणि प्रुशिया यांच्या दरम्यानचें युद्ध, १८७०

१८६१ सालीं दुसरें एक संकट उद्भवलें. **इंग्लंड** आणि **अमेरिका** ह्यांच्या दरम्यान **अटलांटिक महासागरामधून** तारायंत्राच्या तारांचा राजू टाकला होता, त्याच्या द्वारें १८५८ त

आमच्या **राणीकडून युनायटेड स्टेट्सच्या प्रेसिडेन्टाला** पहिला निरोप पाठविला गेलेला होता, आणि त्या तारांच्या राजूनें **इंग्लंड** आणि **अमेरिका** हीं पूर्वींहून अधिकाधिक जवळ ओढलीं जात आहेत, म्हणजे त्या दोहोंमधील स्नेहबंधन अधिकाधिक दृढ होत चाललें आहे, अशी मनुष्यमात्राला आशा उत्पन्न झाली असतां, तीं **संस्थानें** एका यादवीच्या किंवा आपआपसांतील युद्धाच्या भोंवऱ्यांत वाहवत चाललीं होतीं. त्या **संस्थानांपैकीं उत्तर संस्थानांत** गुलामगिरी मना झालेली होती, परंतु **दक्षिण संस्थानांत** अजून गुलाम होते, आणि १८५० त जेव्हां **कालिफॉर्निया** नांवाच्या नव्या संस्थानांत गुलामगिरीची मनाई करणारे कायदे स्वीकारले, तेव्हां त्या **दक्षिण संस्थानां**तील लोकांचीं मनें फार दुखवलीं. तथापि, १८६० पर्यंत **युनायटेड स्टेट्सचे** जे **प्रेसिडेन्ट्स** झाले ते मुख्यत्वेंकरून **दक्षिण संस्थानांच्याच** पक्षाचे होते. त्या वर्षी **आबोलिशनिस्ट्स**, म्हणजे गुलामगिरी नाहींशी करूं इच्छिणारे लोक, **एब्राहाम लिंकन** ह्याला **प्रेसिडेन्ट** निवडण्याविषयीं यत्न करीत होते तो सुफल झाला. **लिंकन** हा न्यायी आणि नेमस्त पुरुष होता. त्यानें जरी **दक्षिण संस्थानांतील** कायद्यांची बूज राखली असती, तरी त्यानें त्यांतील गुलामांचे धनी (गुलाम बाळगणारे लोक) ह्यांवर मेहरबानी केली नसती. त्या **लिंकनाला प्रेसिडेन्ट** निवडलें तेव्हां **दक्षिण संस्थानांतल्या** लोकांच्या मनांत, **उत्तर संस्थानांपासून** पृथक् होऊन, आपल्या संस्थानांचें एक वेगळेंच जूट बनवावें असें आलें. त्यामुळें युद्ध उपस्थित झालें, तें चार वर्षें चालू होतें. **इंग्लंडांतील** कापसाच्या गिरण्यावाले जो कापूस वापरीत, तो मुख्यत्वें त्या **दक्षिण सं-**

युनायटेड स्टेट्समधील युद्ध, १८६१–१८६५.

स्थानांतून येत असे, आणि त्या संस्थानांच्या बंदरांची तर **उत्तर संस्थानांनीं** युद्धामुळें लवकरच नाकेबंदी केली. तीमुळें, **हिंदुस्तान** आणि **ईजिप्ट** ह्या देशांतून कापूस मिळूं लागेपर्यंत, **लांकाशायरांतील** कापसाच्या गिरण्यांत खपणारे हजारों मजूर, पुरुष आणि बायका, हीं बेरोजगार होऊन अगदीं उपाशीं मरूं लागलीं. त्यांच्यासाठीं अनेक फंडें, म्हणजे द्रव्याच्या रकमा, जमविल्या, तथापि त्यांना भयंकर हालअपेष्टा भोगावी लागली. परंतु ती त्यांनीं अति सोशिकपणानें सोसली, आणि माणसांनीं गुलाम कधींही होऊं नये असें त्यांना वाटत असल्याकारणानें त्या चाललेल्या युद्धाविषयीं त्यांना काडीमात्र खेद न वाटतां उलटें ठीक झालें असें देखील वाटत होतें. **इंग्लंडांतील** उंच वर्गांतील लोक त्यांच्या सारखे शाहणे नव्हते. त्यांचा कन्हवाळा मुख्यत्वें **दक्षिण संस्थानां**विषयीं होता, आणि **इंग्लंडांतील** तारवें बांधण्याच्या गोद्यांत पुष्कळ जहाजें बांधलीं आणि तीं **दक्षिण संस्थानां**तील लोकांकडे त्या युद्धांत वापरण्याकरितां जाऊं दिलीं. त्यांतच तें विख्यात **आलाबामा** नांवाचें जहाज होतें. शेवटीं १८६५ त **उत्तर संस्थानांनीं दक्षिण संस्थानांना** जिंकलें, आणि गुलामगिरी बंद केली. इतकेंच मात्र त्या युद्धांत वाईट झालें कीं, **एब्राहाम लिंकन** याला एका मारेकऱ्यानें गोळी घालून ठार मारलें. **अमेरिकन्सांना**, आतां बंडवाल्यांकरितां जहाजें बांधवूं दिलीं हें गैर केलें, म्हणून **इंग्लिश सरकाराकडे** गाऱ्हाणें करण्याला फुरसत झाली, आणि परिणामीं **आलाबामा** नांवाच्या ज-

लांकाशायरमध्यें कापसाच्या संबंधाचा दुष्काळ, १८६१.

आलाबामा नांवाच्या जहाजासंबंधानें नुकसान भरून द्या म्हणून मागण्या होतात.

हाजानें जी नुकसानी केलेली होती ती भरून देण्याकरितां इंग्लंडाला तीस लक्ष पौंड त्यांना द्यावे लागले.

ह्या सर्व गोष्टी बाहेर चालल्या असतां दोन महत्वाच्या गोष्टी इंग्लंडांत घडल्या. १८६१ त डिसेंबरच्या १४ व्या तारिखेस "**आल्बर्ट धि गूड**" नांवाचा **प्रिन्स कॉन्सॉर्ट**, म्हणजे **रा**णीचा पति, हा एका प्रकारच्या काळज्वरानें मृत्यु पावला. तो ही दुनिया सोडून जाई तोंपर्यंत, आपल्यावर त्याचें किती प्रेम होतें आणि आपल्या कल्याणासाठीं त्यानें किती श्रम केले, आपल्या **राज्ञी**ला त्यानें कसा बुद्धिवाद सांगितला, विद्या आणि कला ह्यांना त्यानें किती उत्तेजन दिलें, आणि त्यानें आपल्या मुलांना ह्या संसारांतील मुख्य किंवा वरिष्ठ कर्तव्यांत कशीं सुशिक्षेनें तरबेत केलीं होती, ह्या गोष्टी राष्ट्रांतील लोकांना खरोखर कळल्या नव्हत्या. दुसरी गोष्ट ही कीं, १८६३ त मार्च महिन्याच्या १० व्या तारिखेस **डेन्मार्क** देशच्या **रा**जाची कन्या, **अलेक्झान्ड्रा**, हिच्याशीं **प्रिन्स आफ् वेल्स** ह्याचा विवाह झाला. तो **राजपुत्र** आणि ती **राजपुत्री** ह्या उभयतांनीं आपल्या प्रजाजनांचें किती पूर्ण प्रेम संपादिलें आहे ही गोष्ट, पुढें आठ वर्षांनीं जेव्हां १८७१ त ज्या आजारानें त्याचा बाप वारला त्याच आजारानें तो **राजपुत्र** अगदीं यमपुरीच्या वेशींत पडला होता, तेव्हां प्रत्ययास आली. जेव्हां ती **राजपुत्री** त्या अति संकटाच्या क्षणीं आपल्या पतीच्या कुशीजवळ बसलेली होती तेथून **संड्रिंग्हम** ह्या नांवाच्या खेड्यांतील लहानशा देवळांत त्याला आराम पडावा म्हणून ईश्वरस्तव करण्यासाठीं गेली, तेव्हां

प्रिन्स कॉन्सॉर्ट (राणीचा पति) ह्याचा मृत्यु, १८६१.

प्रिन्स आफ् वेल्स ह्याचें लग्न व दुखणें.

तिच्या बरोबर ज्या स्त्रीच्या किंवा पुरुषाच्या अंतःकरणानें धांव घेतली नाहीं अशी इंग्लंडांत एकही स्त्री किंवा पुरुष नव्हता. जेव्हां फेब्रूअरीच्या २७ व्या तारिखेस **राणी,** तो **राजपुत्र** आणि ती **राजपुत्री** ह्यांसहवर्तमान, तो राजपुत्र दुखण्यांतून बरा झाला म्हणून **सेन्ट पाल** नांवाच्या देवळांत आपणांवर केलेल्या उपकाराबद्दल कृतज्ञतापर ईश्वरस्तव करण्यासाठीं थाटानें गेली, तेव्हां आनंदानें ज्यानें आरोळी ठोकली नाहीं असें एकही माणूस नव्हतें.

ह्या कालावधीमध्यें लिहिण्यासारख्या गोष्टी एकामागून एक झरझर घडल्या. १८६६ त **हाइड पार्क** नांवाच्या कृत्रिमवनांत दंगे झाले. त्यांत जी सुधारणा **लार्ड डार्बी** ह्यानें १८६७ त केली (७४२ वें पृष्ठ पहा) तीकरितां लोकांची ओरड होती. **आयर्लंडांत**ही बखेडा उत्पन्न झालेला होता. तेथें **"फीनियन्स"** (ग्रेटब्रिटनापासून आयर्लंड हें पृथक् स्वतंत्र राज्य व्हावें ह्या हेतूनें ज्यांनीं गुप्त कट केला होता असे आयरिश लोक) नांवाच्या बदमाष लोकांनीं बंड केलें, आणि **इंग्लंडांतील चेस्टर** नांवाचा किल्ला बलात्कारानें घेण्याचा त्यांनीं प्रयत्न केला. त्यांपैकीं पुष्कळांना पकडून कैदकेलें, आणि **क्लर्केन्वेल** एथील तुरुंगांत त्यांना कैदेंत ठेविलें होतें त्या तुरुंगाची भिंत सुरुंगांनीं उडविण्याकरितां पुढें लवकरच एक कट झाला. त्या कटांतील लोकांच्या योजनेप्रमाणें त्या तुरुंगाच्या आसपास गरीब लोकांचीं घरें दाट होतीं त्यांच्यामध्यें सुरुंगांचा मोठा धडाड उडाला खरा, परंतु त्या कैद्यांना सुटून जातां आलें नाहीं. आणखीही अशींच दुष्ट भालेराईचीं कृत्यें **शेफफील्ड** शहरांतील **इंग्लिश** कामकरी लोकांमध्यें झालीं. त्या कामकऱ्यांनीं आपल्या धन्यांपासून विशेष

इंग्लंडांत व आयर्लंडांत झालेले बलात्कार किंवा जुलूम जबरदस्ती.

फायद्याचे करार करून घेण्याबद्दल म्हणून "ट्रेड्झ-यूनियन्स" म्हणजे धंदे-कट, केले, आणि जे कामकरी त्यांनीं केलेले नियम पाळीनात त्यांना त्यांनीं जायबंदी केलें, किंवा ठार देखील मारलें. सरकारानें, त्या जुलूम जबरदस्तीबद्दल सजा करून, शाहणपणानें नवे कायदे केले, त्यांनीं उत्तम उत्तम धंदे-कट होते तेवढे खस्खुरत किंवा कायदेशीर प्रकारानें राहूं दिले, त्यामुळें गुप्त कटांचा बींमोड झाला.

सार्वजनिक आरोग्यरक्षणाविषयीं कायदा, १८६६.

पुढल्या थोड्या वर्षांमध्यें राष्ट्रांतील लोकांच्या कल्याणासाठीं पार्लमेंटचे पुष्कळ कायदे पसार झाले. १८३२, १८४८, आणि १८५३ ह्या सालीं, एशियांत उद्भवणारी महामारी किंवा पटकी ह्या नांवाच्या रोगाच्या भयंकर सांथी इंग्लंडांत आल्या होत्या, तेव्हांपासून गरीबांच्या राहण्याच्या आळ्या आणि घरें हीं स्वच्छ करण्याकरितां मोठे प्रयत्न केलेले होते, आणि सर्व वर्गांतील लोकांनीं आरोग्याच्या नियमाकडे पूर्वींपेक्षां फार लक्ष्य दिलेलें होतें. १८६६ त सानिटरी (आरोग्यरक्षणाचा) किंवा पब्लिक हेल्थ (सार्वजनिक आरोग्यासंबंधी) कायदा पसार झाला, त्या कायद्यानें सरकारी कामदारांना, प्रत्येक घराला योग्य प्रकारच्या मोऱ्या नाले वगैरे करविणें, आणि अनारोग्यकारक प्रकारचा केरकचरा व घाणेरे पदार्थ वगैरे काढून टाकविणें, ह्या गोष्टींविषयीं सखती करण्याचा, आणि प्रत्येक खोलींत किंवा घरांत योग्य संख्येहून ज्यास्त माणसें राहूं न देण्याचा अधिकार दिला. यूरोप खंडाच्या इतर भागांत १८८४, १८८५, आणि १८८६, ह्या सालांत एशिया खंडांत उत्पन्न होणाऱ्या महामारीनें किंवा पटकीनें लाखों लोक मेले. तथापि इंग्लंडांत गेल्या तीस वर्षांत त्या रोगाची म्हणण्या-

सारखी धाम किंवा सांथ आली नाहीं ह्याचें अंशतः कारण ह्या सुधारणा झाल्या हेंच फारकरून असावें. आणखी उलट पक्षीं, **इंग्लंडांत** १८८० सालापासून मृत्यु-मान दरसाल सुमारें ४१००० हजारांनीं कमी होत आलें आहे.

आयर्लंडांतील सरकारी धर्मसंबंधाचें खातें काढून टाकलें, १८६९. जमिनीविषयीं कायदा केला, १८७०.

१८६९–१८७० ह्या सालीं **आयर्लंडाच्या** कल्याणासाठीं मोठमोठ्या गोष्टी केल्या. धर्मसंबंधाचें राजकीय (सरकारी) खातें अजी काढून टाकलें, आणि **क्याथलिक**धर्मी लोक आणि **प्राटेस्टंट**धर्मी लोक ह्यांना, धर्माला सरकारी आश्रयाच्या संबंधानें, समान करून ठेवलें, म्हणजे **क्याथलिक्सांच्या** धर्माला सरकारी आश्रय नव्हता तसाच **प्राटेस्टन्ट्सांच्या** धर्माला सरकारी आश्रय होता तो नाहींसा केला. आणखी **मिस्टर ग्लाड्स्टन** ह्यानें १८७०त **आयरिश लान्ड आक्ट**, म्हणजे **आयर्लंडांतील** जमिनीविषयीं कायदा, पसार करविला. त्या कायद्यानें धारेकरी कुळांना त्यांच्या जमिनींवर पहिल्यापेक्षां विशेष योग्य कबज मिळाला. त्याच १८७० सालांत **मिस्टर फॉर्स्टर** ह्यानें एक **इंग्लिश एज्युकेशन आक्ट**, म्हणजे **इंग्लंडांतील** सार्वजनिक शिक्षणासंबंधी कायदा, पसार करविला. त्या कायद्यानें, जेथें कोठें सर्व मुलांना शिक्षण मिळण्यापुरत्या शाळा नसतील, तेथें एक **स्कूल बोर्ड**, म्हणजे शालामंडल किंवा शाळामंडळी, स्थापावी, आणि त्या शाळामंडळीच्या अधिकाराखालीं नवीन पट्टी बसवून शालागृहें बांधवावीं आणि तीं दुरुस्त राखावीं, असा ठराव झाला. पुढें थोड्या वर्षांनीं दुसरा एक आक्ट (कायदा) पसार झाला. त्यानें प्रत्येक मूल शाळेंत पाठविलेंच पाहिजे अशी सक्ती झाली, आणि **इंग्लंड, स्काट्लंड,** आणि

आयर्लंड, ह्या तिन्ही देशांतील प्राथमिक शिक्षणाच्या शाळांत १८७५ सालीं जितकीं मुलें होतीं, त्यांच्या दुप्पट हालीं मुलें आहेत. ह्या योगानें अज्ञान आणि अनीति ह्यांचा राशि हळूहळू कमी होत चालला आहे, आणि आतां कोणीही माणूस, वाचणें, लिहिणें, आणि आज्ञा पालन करणें, ह्या तीन गोष्टी शिकल्यावांचून लहानाचें मोठें होत नाहीं. शिवाय, विद्या (पदार्थविज्ञानादिक शास्त्रें) आणि कला ह्यांच्या शाळा सर्व देशभर स्थापिलेल्या आहेत, त्यांत थोड्या खर्चानें उंच प्रतीचें शिक्षण मिळतें. उंच वर्गांतील लोकांतही शिक्षणाविषयीं आणि मुख्यत्वें बायकांच्या शिक्षणाविषयीं पूर्वींहून फारच विचार होऊं लागला आहे. हालींच्या काळांतल्या शाळांतून, ह्या संसारांतील यथार्थ गोष्टी, आणि कर्तव्यकर्में, समजून घेण्याचें मनाला वळण लावण्यांत मोठ्या उपयोगी अशा ज्या इतिहास, कला, पदार्थविज्ञानादिक शास्त्रें, आणि इतर विषय, ह्या संबंधाच्या निश्चित गोष्टी, त्या समजण्याचें पूर्वींहून मुलींना अधिक सामर्थ्य येई असें त्यांचें शिक्षण होतें. आणखी **आक्सफर्ड** आणि **केंब्रिज्ज** ह्या उभय ठिकाणीं, स्त्रियांकरितां कालेजिस, म्हणजे पाठशाळा, स्थापलेल्या आहेत. आणि आतां नवऱ्यांच्या बायका, आणि मुलांच्या आया, ह्या आपल्या पतींना आणि पुत्रांना आवडणाऱ्या विषयांविषयीं, आपण अज्ञान किंवा गैरमाहीत राहण्याविषयीं बिलकूल संतुष्ट नाहींत. १८७१ सालीं, **आक्सफर्ड**, **केंब्रिज्ज** आणि **डब्लिन** ह्या तिन्ही शहरांतील **युनिव्हर्सिटिस** ह्यांत धर्मसंबंधी कसोटी, म्हणजे मी स्थापित धर्मांतला आहें, आणि त्याला अनुसरून मी वागेन अशा प्रकारच्या शपथा प्रत्येक विद्या-

एज्युकेशन आक्ट, म्हणजे सार्वजनिक शिक्षणाविषयीं कायदा, १८७०.

स्त्रियांचें शिक्षण.

धर्माला घ्याव्या लागत त्या, बंद केल्या; त्यामुळें आतां कोणीही **चर्च-मन** (बिशपांच्या अध्यक्षतेखालीं असणाऱ्या धर्मांतील माणूस) **डिस्सेन्टर** (स्थापित धर्माला अमान्य माणूस), **क्याथलिक**, **हिंदु**, किंवा **मुसलमान**, त्या **युनिव्हर्सिटि**मध्यें प्रवेश करून तेथें अभ्यास करूं शकतो. ह्याच वर्षी **राणीनें** लष्करांत "**पर्चेस**" म्हणजे, खालच्या हुद्देदारांनी वरचे हुद्दे विकत घेण्याची वहिवाट, होती ती बंद केली. त्यामुळें आतां **कोणीही** लष्करांतील अमलदाराला मोठ्या पायरीचा किंवा पगाराचा हुद्दा विकत घेतां येत नाहीं, परंतु आपल्या देशाची चाकरी फार दिवस आणि चांगली बजावली असेल तर त्या योगें मात्र त्याची पाळी येईल तेव्हां त्याची वढती होते.

धर्मसंबंधी, युनिव्हर्सिटिझ ह्यांत शपथा घ्याव्या लागत त्या, आणि लष्करांतील हुद्दे विकत घेण्याची वहिवाट, हीं बंद होतात, १८७१.

१८७४ सालीं, **डिझरेली** (ह्याला १८७६ त लार्ड बेकन्स्फील्ड हा किताब दिला) हा दुसऱ्यानें मुख्य प्रधान झाला, आणि त्याच्या कारकीर्दीत १८७७ त एक कायदा पसार झाला, त्यानें, **नटाल, केप** (केप आफ् गुड होप), **आरेन्ज फ्री रिपब्लिक** (आरेन्ज नांवाचें स्वतंत्र लोकसत्ताक राज्य), आणि **ट्रान्स्व्हाल**, एथील वसविलेल्या राज्यशाखा ह्यांना एकत्र होऊन एक कट किंवा संयुक्त राज्य करण्याविषयीं कायदा करून परवानगी दिली. ह्या कायद्यानें तादृश फल अद्यापि झालेलें नाहीं, परंतु त्या कायद्याचें सदा स्मरण राहील, कारण, त्याविषयीं **पार्लमेंटांत** वाटाघाट चालली असतां, **मिस्टर पार्नेल** ह्याच्या प्रमुखतेखालीं, **आयरिश** सभासदांनीं "**आब्स्ट्रक्शन**," म्हणजे अ-

आयरिश सभासदांचा अडथळा, १८७७–१८८६.

डथळा, करून उपद्रव देण्यास आरंभ केला. त्या अडथळ्यानें गेल्या नऊ वर्षांत उपयोगी कायद्यांचे खरडे पसार होणें बंद झालें आहे. त्यांची मसलत ही असे कीं, ज्या प्रकरणांविषयीं त्यांना बिलकूल परवा नसे असल्याही प्रकरणांविषयीं जेव्हां जेव्हां साधेल तेव्हां भाषणें करावीं आणि निरर्थक उपद्रव द्यावा, कारण आपण शक्य असेल तेथवर परमावधीचे नावडते होऊन, **इंग्लंडाला**, आपणांला घालवून देऊन आमचें आम्हांला स्वतंत्र **पार्लमेंट** देण्याला भाग पाडूं, अशी त्यांना उमेद होती. मागल्या काळीं **आयर्लंडावर** अन्याय गुदरले त्यांचा विसर पाडण्याकरितां **इंग्लंडानें** होईल तितका परमावधीचा प्रयत्न केला आहे; आणि १८८० त **मिस्टर ग्लाडस्टन** हा पुनः मुख्य प्रधान झालेला होता, त्यानें १८८१ त दुसरा एक **आयरिश लांड बिल**, म्हणजे **आयर्लंडांतील** जमिनींविषयीं कायद्याचा खरडा, पसार करविला. परंतु **पार्नेल** ह्यानें, त्याच्या पूर्वीच्या **ओ'कॉन्नेलाप्रमाणें**, **आयर्लंडाला** स्वतंत्र **पार्लमेंट** मिळविण्याची चळवळ तशीच चालू ठेवली आहे. **आयर्लंड** हें अराजक किंवा झोटिंग पादशाहीच्या, स्थितीला पावलेलें असून, बेकैद किंवा पुंड माणसांनीं **इंग्लंडांतील पार्लमेंटचीं सभागृहें**, आणि लोखंडी सडकांवरील निरपराध माणसांनीं भरलेल्या गाड्यांचे ट्रेन्स, म्हणजे माळा किंवा तांडे, देखील दारूनें उडविण्याचे प्रयत्न केलेले आहेत; तशांत **आयर्लंडांत** आजवर दग्यानें केलेले खून आणि जुलूम जबरदस्त्या ह्या तर फारच भयंकर आहेत. **१८८२** त मे महिन्याच्या ६ व्या तारिखेस, **आयर्लंडाचें** हित करण्याच्या इच्छेनें त्या देशीं गेलेल्या **लार्ड फ्रेडरिक काव्हेन्डिश** नांवाच्या पुरुषाचा, **मिस्टर बर्क**

काव्हेन्डिश आणि बर्क ह्यांचा दग्यानें खून, १८८२.

ह्याच्या समेत, डब्लिन एथील फीनिक्स पार्क नांवाच्या कृत्रिमवनांत नीचपणानें दग्यानें खून केला. शेवटीं १८८६ त, मिस्टर ग्लाड्स्टन ह्यानें आपल्या पूर्वीच्या मतांविरुद्ध मिस्टर पार्नेल ह्याला मिळून एक "होम रूल बिल," म्हणजे आयर्लंडाला स्वराज्य देण्याविषयीं कायद्याचा खरडा, पार्लमेंटांत पसार करविण्याविषयीं प्रयत्न केला. परंतु ग्लाड्स्टनाचा त्या कामांत पराभव होऊन पार्लमेंटाचें विसर्जन झालें. तेव्हां ज्या नवीन निवडणुका झाल्या त्यांत त्याच्या पक्षापैकीं पुष्कळांच्या पार्लमेंटांतील जागा गमावल्या. त्यावरून इंग्लंड, स्काट्लंड, वेल्स, आणि आयर्लंड, ह्या सर्वांची संयुक्तता हीच सर्वांच्या सुखाला अति उत्कृष्ट योग्य असें देशांतील लोकांचें मत स्पष्ट आहे, ही गोष्ट निदर्शनास आली. त्या नव्या निवडणुकांनीं कान्सर्व्हेटिव्ह पक्षाचें पुनः प्राबल्य होऊन लार्ड सालस्बरी हा मुख्य प्रधान झाला. पुढें परिणाम काय होईल, आणि आयर्लंडच्या अतिशय दारिद्र्यामुळें आयरिशांपैकीं जे सोशिकपणानें क्लेश भोगीत आहेत त्यांना इंग्लंड कसें उत्तम प्रकारानें साहाय्य करूं शकेल, ह्या गोष्टी केवळ कालानेंच निदर्शनास येणार आहेत.

होम रूलचा पराभव, म्हणजे देशीराज्यसंबंधी कायद्याचा खरडा नापसंत होतो, १८८६.

इंग्लंडांतही आमच्या विपत्तींवांचून आम्ही राहिलेले नाहीं आहों, कारण लोकसंख्या जसजशी वाढत जाते, तसतसा श्रीमंतांकरितां ऐषआरामाचे पदार्थ उत्पन्न करून आपला केवळ जेमतेम गुजारा मात्र करूं शकतात अशा लोकांचा समुदाय अधिकाधिक मोठा होत चालला आहे, आणि जेव्हां, १८७९ पासून १८८६ पर्यंतच्या काळांसारखे खटनट किंवा दुर्भिक्षाचे काळ ये-

तात, आणि उंच वर्गांतल्या लोकांना खर्चाची पूर्वींपेक्षां तंगी पडते, तेव्हां त्यांच्या ऐषआरामांवर गुजारा करून राहणाऱ्या लोकांची फार हालअपेष्टा होते. शेतकरी लोकांनाही, आतां बाहेरून धान्य आणि इतर खाण्याचे पदार्थ फार स्वस्त देशांत येतात त्यामुळें, आपल्या शेतांपासून खर्च केलेल्या पैशांचें आणि श्रमांचें योग्य प्रतिफल मिळत नाहीं; आणि पार्लमेंटानें, कालेंकरून जमिनीसंबंधी कायदे, हालीं आहेत त्यांहून सर्वांना विशेष न्यायाचे व्हावे अशाकरितां त्यांत कांहीं तरी फेरफार केलाच पाहिजे, ह्या गोष्टीविषयीं कांहीं संशय उरला नाहीं. मधच्या वेळांत, प्रत्येक माणसाला धीर किंवा दम धरलाच पाहिजे. राजनीतिविशारद पुरुषच केवळ नव्हेत, परंतु सर्व वर्गांतील उदार मनाचे पुष्कळ पुरुष आणि स्त्रिया, जे कोणी आपलें आपण साहाय्य करण्यास तयार असतील त्यांना साहाय्य करण्याच्या कामीं आपलीं आयुष्यें खर्च करीत आहेत, आणि पूर्वींहून चांगलीं गृहें, चांगल्या शाळा, मजुरांना उद्योगाला लावण्याविषयीं चांगल्या व्यवस्था, आणि नवीन वसविलेल्या राज्यशाखा ह्यांत हा देश सोडून राहवयास जाण्याची शाहणपणाची योजना, ह्या साधनांनीं पोटासाठीं धडपडत असणाऱ्या गरीब लोकांची संख्या कमी करण्याविषयीं तीं उदार मनांचीं माणसें प्रयत्न करीत आहेत.

इंग्लंडांतील अडचणी किंवा संकटें.

शेवटीं, गुजरून गेलेल्या पन्नास वर्षांत, नव्या नव्या कृति, विद्या, कला, आणि ग्रंथकलाप, ह्यांची इतकी समृद्धि झालेली आहे कीं, त्यांचें एथें संकलित वर्णन करणें देखील अशक्य आहे. ह्या कृतींपैकीं एकंदरीनें देशाला खचीत अत्यंत महत्वाच्या किंवा उपयोगाच्या झालेल्या ज्या कृति आहेत, त्या ह्या; (१) यंत्रें, (२) लोखंडी

शास्त्र किंवा सेंद्रिय प्राणीशास्त्र), ह्या दोन शास्त्रांचा प्रवेशमार्ग लाइएल्ल, डार्विन, आणि हर्बर्ट स्पेन्सर, ह्यांनीं दाखवून दिला आहे, त्या शास्त्रांसंबंधीं नवीन शोधांनीं, प्रत्येक माणसाला, जर इच्छा असेल तर त्याला अनुसरतां येतील, असे विचाराचे नवीन मार्ग खुले केलेले आहेत; कारण, आतां पुस्तकें फार स्वस्त किंमतीनें विकतात, आणि १८५० सालीं पहिल्यानें स्थापलेल्या फुकटशाई (मुक्तद्वार) पुस्तकालयांत मोठमोठ्या शहरांत सर्व लोकांना खर्चावांचून वाचण्याची सोय झालेली आहे. आणि जे कोणी आपलीं मनें सुशिक्षित करण्याविषयी, आणि विद्याभ्यासानें पहिल्यापेक्षां शाहणे आणि सुजन होण्याविषयी, खरोखर काळजी वागवीत असतील, त्यांना वाचण्याला चांगल्या व हितकारक पुस्तकांची खचीतच उणीव नाहीं. इतिहास ह्या विषयांत, ग्रोट आणि लार्ड मकॉले ह्यांसारख्या ग्रंथकारांमागून, ग्रीन, फ्रीमन, गार्डिनर, आणि लेकी, हे ग्रंथकार झालेले आहेत. पोलिटिकल इकॉनोमींत (व्यवहारमीमांसा शास्त्रांत) जान स्टयूअर्ट मिल्ल, आणि फॉसेट ह्यांनी मनुष्यांना निर्मल किंवा आंध्यरहित विचार करण्याला लावलेलें आहे. फिलॉसोफी (तत्वमीमांसा) आणि आर्ट (कला) ह्या दोहों विषयांत, कार्लाइल हा, जें खोटें किंवा असत्य असेल त्याचा द्वेष करावा, आणि रस्किन हा, जें सुंदर असेल त्याविषयीं आवड ठेवावी, असें शिकवितो. कल्पित कादंबरींत थाकरे आणि डिकेन्स, शार्लोट्ट ब्रॉन्टे आणि जार्ज एलियट, ह्यांनीं आम्हांला रडवायाला, आणि हांसवायाला लावलेलें आहे; शिवाय टेन्निसन आणि ब्रौनिंग ह्यांनीं काव्यांतील स्वप्नसृष्टीनें आमचीं अंतःकरणें भरून टाकलीं आहेत. कोणींही माणसांनीं प्रवासवर्ण-

विद्या आणि ग्रंथकलाप.

नांचीं पुस्तकें किंवा एकादें दररोजचें वर्तमानपत्र देखील हातीं घे-तलें असतां, धैर्य, साहसाची आवड, आणि आत्मार्पण करण्याची किंवा आत्माहुति देण्याची वृत्ति, ह्यांनीं, प्राचीन कालाप्रमाणेंच, अझूनही इंग्लिश लोकांना महत्कृत्यें करण्याविषयीं प्रवृत्ति किंवा प्रेरणा होत आहे, ही गोष्ट त्यांना कळल्यावांचून राहणारच नाहीं. इंग्लिश लोकांनी, ट्यूटन्सांच्या प्राचीन भटकण्याच्या वृत्तीला इमा-नीपणाने अनुसरणारे होऊन, आमच्या हालीच्या काळांत, उत्तर ध्रु-वालगतच्या प्रदेशांत, व आफ्रिकेच्या गर्भप्रदेशांत जाऊन संक-टाला तोंड दिलेलें आहे. सर जान फ्रान्क्लिन, आणि लि-व्हिंग्स्टन हे नवीन देश शोधून काढण्याच्या प्रयासांत मृत्युमुखीं पडले; आणि चार्लेस जार्ज गॉर्डन हा, आपला प्राण आपल्या हातावर घेऊन, ज्या लोकांवर त्याचें अतिशय प्रेम होतें, त्यांना त्याच्या हातून बचावणें जरी न झालें तरी, त्यांच्या समेत मरण्याला एकटा खार्टूम एथें गेला.

. . . .

आंगल्स, जूट्स, आणि साक्सन्स, हे लोक ज्याकाळीं प्रथम ब्रिटिशांच्या किनाऱ्यांवर आपल्या सपाट तळांच्या बोटींतून समुद्रावरून येऊन जमिनीवर उतरले, त्या काळापासून, ज्या हालींच्या काळांत इंग्लिश जहाजें सर्व पृथ्वीवर असलेल्या इंग्लिशांच्या ताब्यांतील बंदरांत नेहमी जात येत असतात, त्या काळापर्यंत, आम्ही इंग्लिश शाईचा इतिहास अनुक्रमानें सांगितला. परदे-शांत मिळविलेल्या ह्या मुलुखाबरोबर संकटेंही येतात ह्यांत संशय नाहीं. रशिया अफघाणिस्तानांत आम्हांला अझून भय दा-खवीत आहे, आणि ज्या स्वेझ कनालानें (स्वेझच्या कालव्यानें) १८६९ त हिंदुस्तानाला पूर्वीपेक्षां जवळचा मार्ग आम्हांला खुला

केला, त्याच कालव्यामुळें, "**ईस्टर्न केस्चन,**" म्हणजे पूर्वेकडील लढा किंवा वाद, म्हणून जें एक त्रासदायक प्रकरण आहे, त्यांत आमचा फार हितसंबंध असल्याकारणानें आम्हांला अतिशय मन घालावें लागतें. परंतु १८७८ त **बर्लिन** एथें एक **कांग्रेस्स,** म्हणजे मुतसद्दी (राजप्रेषित) पुरुषांची एक सभा, जमली होती, तींत **लार्ड बेकन्स्फील्ड** ह्यानें आपल्या मरणाच्या तीन वर्षें अगोदर **यूरोपां**तील सर्व राष्ट्रांशीं एक तह केला. त्या तहानें नुकताच आम्हांला युद्धांत पडण्याचा प्रसंग आलेला होता तो टाळला, आणि **अफघाणिस्तान**ची सर हद्द सलूख्यानें ठरविण्याविषयीं सर्व प्रकारचे प्रयत्न होत आहेत. शिवाय, जर विस्तीर्ण राज्याच्या पायीं काळजी उत्पन्न होते असें म्हणावें, तर त्या राज्याच्या बरोबर सामर्थ्यही तसेंच येतें. इतकें मात्र खरें कीं, पूर्वीच्या असलेल्या राज्याचें रक्षण करण्यासाठीं, नवीन मुलूख संपादणें वारंवार भाग पडतें. ह्याच कारणास्तव, **बोर्निओ** बेटाचा उत्तर भाग, **न्यू गिनी** बेटाचें पूर्वार्ध, आणि **सोकोत्रा** बेट, हीं फार अलीकडे आमच्या साम्राज्याला जोडलेलीं आहेत.

ह्या इतिहासाची समाप्ति.

१८८६ सालीं **लंडनां**त दुसरें एक **एक्स्हिबिशन** (प्रदर्शन) झालें. ह्यावेळीं " सर्व राष्ट्रांचें " प्रदर्शन झालें नाहीं, परंतु "**हिंदुस्तान** आणि वसविलेल्या **राज्यशाखा**" ह्यांत उत्पन्न होणाऱ्या पदार्थांचें प्रदर्शन झालें, आणि त्याच्या योगें **इंग्लंड**ची सत्ता किंवा अमल किती दूरवर पसरलेला आहे, हें आमच्या विलायतेंतील लोकांच्या पहिल्यानेंच प्रत्यक्ष नजरेस आलें. ही गोष्ट खरी कीं, त्या प्रदर्शनांत, **माल्टा**

कॉलोनियल आंड इन्डियन एक्स्हिबिशन.

आणि **सैप्रस** ह्या बेटांखेरीज **यूरोपां**तील इतर देशांतले पदार्थ कांहींही नव्हते. तथापि **एशिया** खंडांतून, **हिंदुस्तान**ची सर्व पदार्थसंपत्ति, आणि **सिलोन** (सिंहलद्वीप), **स्ट्रेट्स सेटलमेंट्स** (मलाया द्वीपकल्पांतील दोन प्रांत व पिनांग व सिंगापूर हीं दोन बेटें), **नार्थ बोर्निओ** (उत्तर बोर्निओ), आणि **हांगकांग,** ह्या मुलुखांत उत्पन्न होणारे पदार्थ, आले. **आस्ट्रेलेशियां**तून, सोनें, रुपें, तांबें, लोखंड, कथील, लोंकर, द्राक्षांची दारू, आणि धान्यें, हीं आलीं. **आफ्रिका** खंडांतून **केप** (केप आफ् गुड होप) एथून हिरे आणि शहामृगाच्या पिसें, **सिएरालिओने** आणि **गोल्डकोस्ट** (सोनें उत्पन्न होणारा किनारा) एथून हस्तिदंत आणि सोन्याचे दागिने, आणि **मॉरिशस** बेटांतून उमदें लांकूड, हे पदार्थ पाठविले. **उत्तर अमेरिका** खंडांतील, **कानडा** देशानें, **हड्सन**च्या अखातांतील **फर-सील्स** (नाजूक लंव आंगावर असलेलीं समुद्रांतील एक प्रकारचीं जनावरें) ह्या नांवाच्या जनावरांपासून, तों त्या देशांतल्या जंगलांतील इमारतीच्या कामाच्या उमद्या लांकडांपर्यंत, जे पुष्कळ पदार्थ उत्पन्न होतात ते सर्व पाठविले. **मध्य अमेरिकें**तील **ब्रिटिशां**च्या अमलाखालील **हाँड्युरास** नांवाच्या देशानें **महॉगनी** नांवाचें लांकूड आणि साखर हे जिन्नस पाठविले. **दक्षिण अमेरिकें**तील **ब्रिटिश** (ब्रिटिशांच्या अमलाखालील) **गियाना** ह्या देशानें अनेक प्रकारचे डीक, तेलें, आणि झाडांच्या साली, पाठविल्या; आणि **वेस्ट ईंडिझ** नांवाच्या बेटांनीं आपले मसाल्यांचे जिन्नस, रम (काकवी पासून केलेली प्यावयाची दारू), साखर, आणि सुंदर बुरूडकाम, पाठवून त्या प्रदर्शनांतील प्रत्येक वळणावर त्या द्वीपसमुदायांतील अनेक बेटांपैकीं एकेका बेटाचें नांव प्रदर्शित केलें. ह्या त्या त्या देशांत

उत्पन्न होणाऱ्या मूल द्रव्यांशिवाय हस्तकौशल्यानें तयार केलेले सर्व प्रकारचे जिन्नस त्या त्या देशांतून आलेले होते. त्यांपैकीं पुष्कळ, आमच्या देशांत तसल्या प्रकारचे जिन्नस कारागिरीनें तयार करतात, त्यांहून चांगले असून, **इंग्लिश** लोकांनीं, स्वदेश त्याग करून परदेशांत वसाहती करून राहण्यानें कल्पक शक्तींत किंवा कारागिरींत आपलें कौशल्य आणि शाहणपण गमावलें नाहीं, इतकी एक गोष्ट त्या परदेशीय कारागिरीच्या पदार्थांवरून प्रत्ययास आली. १८५१ सालच्या **बड्या प्रदर्शनानें** ज्या मोठमोठ्या आशा उत्पन्न केलेल्या होत्या त्या सर्व लवकरच विलयास गेल्या हें पाहण्यांत आलेंच आहे; कारण अत्यंत वेगळालीं हितें आहेत ज्यांचीं अशा वेगळाल्या लोकजाती, आणि वेगळाल्या राष्ट्रांतील लोक, ह्यांचा संबंध जेथें येतो, तेथें युद्ध मुतराम् नाहींसें होऊन समजुतीनें आणि मित्रभावाच्या लवादीनें लढ्यांचे निकाल होऊं लागण्यापूर्वी अझून कांहीं काळ गेला पाहिजे असा संभव दिसतो. १८८६ सालचें प्रदर्शन हें तरी मागल्या प्रदर्शनाहून शुभसूचक शकुनाचें होवो, अशी आपण आशा करूंया; कारण **हिंदुस्तान**चे आणि वसविलेल्या राज्यशाखांतले रहिवासी हे सर्व एकाच **चक्रवर्तिनी राणी**ची प्रजा आहेत, आणि **आस्ट्रलेशियांत** आणि **कानडा** देशांत वसविलेल्या राज्यशाखांत तरी निदान, बहुतेक लोक भाषा, लोकजाती, आणि अंतःकरण, ह्यांच्या संबंधानें **इंग्लिश** आहेत. आणि **अट्लांटिक महासागराच्या** पैल तीरीं स्थापलेल्या मोठ्या राष्ट्रांतील **अमेरिकन्स** लोक ह्यांना शंभर वर्षांपूर्वी अविचारी मुतसद्दीपणानें आम्हांपासून दूर दवडलें ह्या कारणानें, जरी वेगळ्या प्रदर्शनाच्या द्वारें, ह्या १८८७ सालांत त्यांचें

इंग्लिश भाषा बोलणाऱ्या लोकांचें ऐक्य.

वैभव दाखविलें जाणार असेल, तरी त्यांत खेद वाटण्याजोगें कांहीं नाहीं; प्राचीन काळांतील **इंग्लंडा**विषयीं ज्या आठवणी त्यांना असतील त्यांच्या योगें त्यांचें आमचें नातें आहेच. **इंग्लिश** भाषा बोलणाऱ्या लोक जातीला भविष्यकाळाकडे आशाभरितपणानें पाहण्याला प्रवृत्त करण्यास हरएक प्रकारचें प्रोत्साहक हालीं खचीत आहेच; आणि पृथ्वीच्या सर्व भागांत असलेल्या **इंग्लंड**च्या पुत्रांना एकत्र बद्ध करून ठेवण्याला वरदीच्या किंवा खुणेच्या शब्दाची जरूर असेल तर, तो शब्द **नेल्सना**च्या पुढें लिहिलेल्या उदार किंवा प्रौढ बोलांमध्यें मिळतो:—

> "इंग्लंड, प्रत्येक माणसानें आपलें कर्तव्य
> करावें, अशी प्रतीक्षा करतें."

सूची.
